।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## EXAMINATION SECTION

Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520

Website: www.srtmun.ac.in

E-mail: srtmuncoe@gmail.com

संदर्भ : परीक्षा /२०२१–२२/ 95

दिनांक : ०७/०६/२०२१

## सुचना

### उन्हाळी २०२१ करीता परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याबाबत विद्यार्थी व महाविद्यालयांना मार्गदर्शक सुचना.

सर्व संलग्नीत महाविद्यालयातील व्यावसायीक व अव्यावसायीक
पदवी व पदव्यूत्तर सर्व अभ्यासक्रम

(वार्षिक, अभ्यासक्रम (१००, ८०:२०), सत्रपध्दती अभ्यासक्रमातील (४०:१०Theory), (40:10 MCQ), (25:15 Theory MCQ pattern) या सर्व अभ्यासक्रमाच्या अनुत्तीर्ण, ATKT व F-ATKT विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तीनपेक्षा जास्त संधी दिल्यामुळे दि.१७.०५.२०१६ व दि.०७.१२.२०१० च्या परीपत्रकानुसार वरील सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना परीक्षा आवेदनपत्र भरताना (सर्व विषयांसाठी, प्रात्यक्षिक व अंतर्गत गुणासह) नवीन सत्रपध्दती CBCS अभ्यासक्रमानुसार संपुर्ण विषयाने परीक्षा आवेदन पत्र भरणे बंधनकारक आहे.

CGPA PATTERN प्रथम, व्दितीय, तृतीय वर्ष अभ्यासक्रमांच्या संधी संपलेली असल्यामुळे अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी नवीन CBCS अभ्यासक्रमाप्रमाणे अनुत्तीर्ण विषयी परीक्षा देणे अनिवार्य राहील.

तसेच प्रथम,व्दितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना Theory +MCQ अभ्यासक्रमाप्रमाणे परीक्षा देण्याची शेवटची संधी उन्हाळी–२०२० ही होती. त्यानंतर अनुत्तीर्ण असणा–या विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमानुसार/नवीन परीक्षा पध्दतीनुसार केवळ अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा द्यावी लागेल.

०१. विद्यार्थ्यांनी संबंधीत महाविद्यालयात परीक्षा आवेदनपत्र सादर करावयाची तारीख.

अ. नियमित शुल्कासह दि. ०७/०६/२०२१ ते २५/०६/२०२१.

ब. दि.२६/०६/२०२१ ते ३०/०६/२०२१ पर्यत प्रति दिवस रू. ५०/– विलंब शुल्क आकारून सदरील परीक्षा आवदेनपत्र केवळ परीक्षा विभागातच स्विकारले जातील, असे परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयाने स्विकारू नये. **या तारखेनंतर विद्यार्थ्यांचे विलंब शुल्काचे परीक्षा आवेदनपत्र परीक्षा विभागात पाठवू नये.**

०२. महाविद्यालयांनी सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्काचा धनाकर्ष अभ्यासक्रम निहाय जसे की BA, B.Com, B.Sc असे विद्याशाखानिहाय मा. वित्त व लेखा अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या नावे काढावा. तो धनाकर्ष दि.२८/०६/२०२१ किंवा त्या पुर्वीच्या तारखेचा असणे आवश्यक आहे.अथवा IDBI बँकेच्या A/C खात्यामध्ये NEFT/RTGS व्दारे दि. २८/०६/२०२१ रोजी भरणा करावे. धनाकर्ष किंवा NEFT/RTGS विहीत तारखे नंतर काढल्यास १० दिवसा पर्यंत प्रतीदिन रू. ५००/– तर १० दिवसानंतर प्रतीदिन रू. १०००/– विलंब शुल्क आकारण्यात येईल.

NEFT द्वारे परीक्षा शुल्क भरताना अभ्यासक्रमनिहाय भरावे; अन्यथा परीक्षा आवेदन पत्र स्वीकारले जाणार नाहीत. तसेच परीक्षा शुल्काचा धनाकर्ष/NEFT/RTGS अतिरिक्त काढू नये, तसे केल्यास अतिरिक्त असलेली रक्कम इतरत्र वर्ग केली जाणार नाही.

**Mode of Payment :**

a) **Payment through RTGS/ NEFT :**
**Name of the A/C holder–Finance & Accounts Officer, S.R.T.M. University, Nanded.**
**Name of Bank : IDBI Bank, Nanded**
**IFSC Code : IBKL0000500**
**A/C Number 500104000028422**

०३. वरील सर्व अभ्याक्रमांची **परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन** स्विकारण्यात येतील त्यासाठी दि.१७/०६/२०२१ ते २६/०६/२०२१ या दरम्यान ऑनलाईन लिंक चालू राहील. **सदरील लिंकमध्ये विद्यार्थ्यांचे अचूक मोबाईल नंबर व मेल आयडी टाकणे आवश्यक आहे.** त्यानुसार परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन भरून त्यांची प्रिंट आउट काढावी व परीक्षा आवेदनपत्र सादर करावी. तसेच परीक्षा शुल्काचा तक्ता (Statement) अभ्यासक्रम व वर्गनिहाय सॉफ्ट कॉपीमध्ये परीक्षा आवेदनपत्रासोबत सादर करावा.

महाविद्यालयांनी परीक्षा आवेदनपत्र व विहीत शुल्काचा धनाकर्ष विद्यापीठात सादर करण्याचे वेळा पत्रक खालील प्रमाणे राहील. विहीत तारखेस परीक्षा आवेदनपत्र सादर न केल्यास महाविद्यालयास प्रती विद्यार्थी प्रती दिन रू. २/— किंवा रू. १०००/— या पैकी जे जास्त असेल तो विलंब शुल्क आकारण्यात येईल.

| अ.क्र. | जिल्हा | महाविद्यालय क्रमांक | तारीख | आवेदनपत्र सादर करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | नांदेड | १०१ ते १२१ | **२९/०६/२०२१** | **प्रस्तुत विद्यापीठ** |
| ०२ | नांदेड | १२२ ते उर्वरीत सर्व | **३०/०६/२०२१** | **प्रस्तुत विद्यापीठ** |
| ०३ | परभणी | २०१ ते २२१ | **२९/०६/२०२१** | **उपकेंद्र परभणी** |
| ०४ | परभणी | २२२ ते उर्वरीत सर्व | **३०/०६/२०२१** | **उपकेंद्र परभणी** |
| ०५ | हिंगोली | २०१ ते २२१ | **२९/०६/२०२१** | **न्यू मॉडेल कॉलेज,हिंगोली** |
| ०६ | हिंगोली | २२२ ते उर्वरीत सर्व | **३०/०६/२०२१** | **न्यू मॉडेल कॉलेज,हिंगोली** |
| ०८ | लातूर | ३०१ ते ३२१, | **२९/०६/२०२१** | **उपकेंद्र लातूर** |
| ०९ | लातूर | ३२२ ते उर्वरीत सर्व | **३०/०६/२०२१** | **उपकेंद्र लातूर** |

०४. वर नमुद केलेले विहीत परीक्षा आवेदनपत्र विद्यापीठ प्रकाशन विभागात रू. ०५/— भरून घ्यावेत. अथवा विद्यापीठाच्या संकेत स्थळावरून (www.srtmun.ac.in.) डाउन लोड करून घेता येईल. जे विद्यार्थी सदर आवेदनपत्र संकेत स्थळावरून घेतील त्यांचे शुल्क रू. ०५/— अधिकचे भरून घ्यावेत.

०५. वरील आवेदनपत्रे महाविद्यालयांनी केवळ खास दुतामार्फतच पाठवावीत पोष्टाने किंवा अन्य मार्गाने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

०६. विद्यार्थ्यांच्या निकालातील त्रूटी जसे की पात्रता क्रमांक, राखीव निकाल, प्रशासकीय कारणास्तव राखीव निकालाच्या पुर्ततेसाठी महाविद्यालयांच्या प्रतीनिधीने विद्यापीठात संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करावी. कोणत्याही परिस्थीतीत विद्यार्थ्यांना पाठवू नये.

०७. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षासाठी स्वतंत्र परीक्षा आवेदन पत्र भरण्यात यावे. तसेच नियमित व बॅकलॉग विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्राचे स्वतंत्र गठ्ठे बांधण्यात यावेत.

०८. उन्हाळी—२०२१ परीक्षेकरीता प्रथम वर्ष बॅकलॉग, द्वितीय वर्ष नियमित/बॅकलॉग व तृतीय वर्ष नियमित/बॅकलॉग साठी स्वतंत्र याद्या सादर कराव्यात. तसेच सदरील याद्या वर्षनिहाय व बैठक क्रमांक निहाय असणे आवश्यक आहे.

०९. विना अनुदानीत महाविद्यालयांनी दि.२६/०७/२०१९ रोजीच्या परीपत्रकानुसार विषय निहाय/ अभ्यासनिहाय प्राध्यापकांच्या यादी व विद्यापीठ मान्यता प्रत परीक्षा आवेदनपत्र सादर करतांना जोडणे आवश्यक आहे.

१०. सर्व प्राचार्यांनी परीक्षा आवेदन पत्र अग्रेषीत करताना संबंधीत विषयास संलग्नीकरण व अभ्यासक्रम सुरु आहे काय याची खात्री करावी.

तरी वरील सुचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी. कळावे!

प्र.संचालक
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

प्रत माहितीस्तव:—

१. मा. कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.
४. सर्व विभागप्रमुख, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.